51.

क्र. मुंमप्रविप्रा/बैठक/विशेष [४३]

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे [पूर्व], मुंबई – ४०० ०५१

दिनांक : १ जानेवारी, १९८७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६ डिसेंबर, १९८६ रोजी झालेल्या विशेष बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्री. वि. आसगांवकर
१/१/८७

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी

No.BMRDA/MTG/SPL(43).

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th floor, Bandra(East),
BOMBAY- 400 051.

Date : 1st January, 1987

The minutes of the Special meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 26th December, 1986 are enclosed.

2. Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V. Asgaonkar 1/1/87
( S.V. ASGAONKAR )
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

-------------

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## विशेष बैठकीचे कार्यवृत्त

<u>दिनांक</u> : २६ डिसेंबर, १९८६ [शुक्रवार]

<u>वेळ</u> : सकाळी ११-३० वाजता

<u>स्थळ</u> : मा. नगर विकास मंत्री यांचा कार्यालय कक्ष, [२रा मजला] मंत्रालय

<u>उपस्थित सदस्य</u> :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रमण्यन्<br>नगर विकास व गृहनिर्माण मंत्री | — | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णू सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री | — | सदस्य |
| श्री. दत्ता नलावडे<br>मुंबईचे महापौर | — | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | — | सदस्य |
| श्री. भगवंतराव अ. पाटील<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | — | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि. पटेल<br>नगरसेविका, मुंबई महानगरपालिका | — | सदस्या |
| श्री. रमेश दुबे,<br>विधान सभा सदस्य | — | सदस्य |
| श्री. चंद्रशेखर प्रभू<br>विधानसभा सदस्य | — | सदस्य |
| श्री. स. शं. तिनईकर<br>महापालिका आयुक्त<br>मुंबई महानगरपालिका | — | सदस्य |
| श्री. दिनेश कुमार जैन<br>शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | — | सदस्य |

...२/-

श्री. दिनेश अफझुलपूरकर — सदस्य
शासनाचे सचिव,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य
विभाग,

श्री. ल. चं. गुप्ता, — सदस्य
व्यवस्थापकीय संचालक,
सिडको

श्री. एस. आर. काकोडकर, — सदस्य-सचिव
महानगर आयुक्त

बाब क्र. १ : जलमार्ग खोदाई प्रभार भरण्यापासून सूट मिळावी म्हणून वांद्रे येथील बेहराम सुधार समितीने केलेली विनंती

१.१ या बाब टिप्पणीवर झालेल्या चर्चेत पुढील मुद्दे मांडण्यात आले :

१.१.१ बेहराम सुधार समितीने बांधलेल्या अल्प उत्पन्न गटांतील गाळ्यांसारखे गाळे हे त्यांच्या मूळ सदस्यांकडून हस्तांतरीत केले जाण्यास मुभा देण्यात येऊ नये म्हणून श्री. चंद्रशेखर प्रभू यांनी सुचविल्याप्रमाणे त्यासाठी अटी विहीत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१.१.२ वरील गोष्टीसापेक्ष गाळा-धारणेच्या पात्रतेसाठी भारत सरकारने अल्प उत्पन्न गट गृहनिर्माणासाठी विहीत केलेली मासिक उत्पन्न मर्यादा आणि गाळ्याचा खर्च यासंबंधीच्या अटींची पूर्तता करणा-या संबंधित झोपडपट्टीवासियाना जलमार्ग खोदाई प्रभाराचा भरणा करण्यापासून सूट देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. वांद्रे-कुर्ला समूहातील इतर झोपडपट्टीवासियाना देखील, जर त्यानी आपणहून तत्सम योजना हाती घेतल्या तर तशीच सवलत यापुढे दिली जावी यावर एकमत झाले. महानगर आयुक्त यानी प्रत्येक प्रकरणाचा गुणवत्तेनुसार विचार करून निर्णय घ्यावा यावरही एकमत झाले.

१.१.३ दहा वर्षापूर्वी निश्चित करण्यात आलेला व आजही अंमलात असलेला जलमार्ग खोदाई प्रभाराचा प्रति चौरस मीटरला रु. १५०/- हा दर जलमार्ग खोदाईवरील प्रत्यक्ष खर्चाची तोंडमिळविणी करण्यास अपुरा पडतो आणि तेव्हापासून जलमार्ग खोदाईवरील प्रत्यक्ष खर्चात दुप्पट वाढ झाली आहे, अशा स्थितीत विद्यमान रु. १५०/- हा दर मुळातच सवलत ठरते याची नोंद घेण्यात आली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची गंगाजळी यापूर्वीच

....३/-

खाली गेली आहे. त्याउपर अल्प उत्पन्न गटातील गृहनिर्माणास जलमार्ग खोदाई प्रभारातून सूट दिली गेल्यास गंगाजळी आटून जाईल आणि म्हणून प्राधिकरणाच्या निधीत वाढ होण्यासाठी अर्थोपाय योजण्यात यावेत यावर काही सदस्यांनी भर दिला. किमानपक्षी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सांविधिकरित्या देय असलेली सालीना रु. ५/- कोटीची रक्कम तरी मिळावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा या मुद्यावर विशेष भर देण्यात आला.

१.२ त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

<u>ठराव क्र. ३२३ :</u>

"<u>असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की,</u> भूतपूर्व स्थायी समितीने दिनांक १६-१०-१९८० रोजी मंजूर केलेल्या ठराव क्र. १५१ मध्ये किरकोळ फेरफार घडवून — सोबत प्राधिकरणाच्या दिनांक २ जानेवारी, १९८६ रोजी आयोजित बैठकीत सादर करण्यात आलेल्या कार्यसूचीतील बाब क्र. १७ संदर्भात झालेल्या निर्णयाचे अवलोकन करून आणि विद्यमान बाब टिप्पणीत कथन केलेली वस्तुस्थिती आणि परिस्थिती यावर विचारविमर्श करून हे प्राधिकरण [मुं. म. प्र. वि. प्रा. ], महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या पट्टेदारांकडून किंवा इच्छुक पट्टेदारांकडून, त्यांना वांद्रे-कुर्ला समूहात स्थित आणि भाडेपट्टीने देण्यात आलेल्या किंवा भाडे पट्टीने दिल्या जाण्यास संमती असलेल्या जमिनीबाबत पुढील शर्तींच्या अधीन राहून जलमार्ग खोदाई प्रभार गोळा आणि वसूल न करण्यास आपली मान्यता देत आहे.

[१] पट्टेदार किंवा इच्छुक पट्टेदार आणि सदर पट्टेदार किंवा इच्छुक पट्टेदार एक निकाय निगम आहे असे असल्यास त्या बाबतीतही त्याचे सर्व सदस्य अल्प उत्पन्न गटातील असावे लागतील,

[२] "अल्प उत्पन्न गट" या शब्दप्रयोगाची व्याख्या, मासिक उत्पन्न रु. १५००/- इतके उत्पन्न असलेली एखादी व्यक्ती असा होतो,

[३] गटातील प्रत्येक सदस्य पट्टेदाराने किंवा इच्छुक पट्टेदाराने जशी स्थिती असेल तशी धारण करावयाच्या एखाद्या घराची किंवा गाळ्याची किंमत रु. ३००००/- हून अधिक असता कामा नये,

[४] गटातील प्रत्येक सदस्य पट्टेदाराने किंवा इच्छुक पट्टेदाराने जशी स्थिती असेल तशी, मागे न घेता येणारे एक शपथपत्र प्राधिकरणाला सादर करावे लागेल. आणि त्या शपथपत्रात त्याने ते सादर केल्याच्या दिनांकापासून १० वर्षांचा काळ मोजून होईल इतका अवधी उलटेपर्यंत सदर घर किंवा गाळा कि स्वत:चे अधिकार किंवा त्याखालील उपार्जित लाभांचे हस्तांत किंवा स्वत:च्या तद्विषयक हक्कांचे अभिहस्तांतरण करणार नाही किंवा ते हक्क सोडून देणार नाही याची लेखी हमी द्यावी लागेल,

[५] एखाद्या गाळ्याच्या हस्तांतरणाच्या कोणत्याही वेळेला सदर गाळ्याच्या भोगवटयाच्या तारखेपासून जलमार्ग खोदाई प्रभाराचा परिगणन केलेला प्रमाणशीर खर्च अधिक व्याज यांचा सोसायटीने प्राधिकरणाला भरणा करावा लागेल,

[६] गाळ्याचा भोगवटा मूळ पट्टेदाराकडे [विद्यमान छायाचित्र पासधारक] नाही असे कोणत्याही वेळेला जर आढळून आले आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या नियमाविरूध्द अन्य कुणापाशी त्यांचा भोगवटा असल्याचे आढळून आले तर त्या गाळ्याच्या भोगवटयाच्या तारखेपासून परिगणन केलेल्या जलमार्ग खोदाई प्रभाराचा प्रत्यक्ष प्रमाणशीर खर्च अधिक व्याज भरण्यास सोसायटी [बेहराम सुधार समिती] जबाबदार राहील,

[७] अशा प्रभारांच्या चुकवेपणाबाबतीत, वसूलीसाठी सोसायटीने [बेहराम सुधार समितीने] बँकेची हमी किंवा तत्सम हमी द्यावी लागेल.

"<u>त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की</u>, उपरोक्त अटींशी अधीन राहून बेहराम सुधार समितीकडून ती महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचा इच्छुक पट्टेदार असल्याकारणाने -- जलमार्ग खोदाई प्रभार गोळा आणि वसूल करण्यात येऊ नये,

"<u>त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की</u>, पूर्वगामी ठरावाची कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात यावे आणि येत आहे."

....५/-

बाब क्र. २ : लो
बा
नि
आय

बैठकीस
की, लोखंड व पो
त्यांची बाब - ि
प्रारूप अधिसूचना
अशी त्यांनी विन

[१] मुं
क्षे

१.
२.
३.
४.
५.
६.
७.
८.
९.
१०.
११.
१२.
१३.
१४.
१५.
१६.
१७.
१८.

बाब क्र. २ : लोखंड व पोलादाच्या घाऊक बाजारपेठेचे कळंबोली येथे स्थलांतर बाजारपेठ क्षेत्र आणि बाजारपेठ आवार घोषित करण्यासंदर्भात निर्गमित अधिसूचना बीएमआरडीए क्र. टीसीपी/पीओ[एम]/आय एन्ड एस/५४७, दिनांक २२ सप्टेंबर, १९८६ मध्ये दुरूस्ती

बैठकीस ही बाब सादर करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, लोखंड व पोलादाचा घाऊक व्यापार सध्या ज्या ठिकाणाहून चालतो त्यांची बाब – टिप्पणीस जोडलेली विद्यमान सूची आणि त्या सोबतची प्रारुप अधिसूचना परिपूर्ण नाही. त्याऐवजी पुढील ठिकाणे घेतली जावीत अशी त्यांनी विनंती केली. प्राधिकरणाने सूचनेला संमती दिली.

[१] मुंबईच्या बेटभाग शहरातील पुढीलप्रमाणे ओळखली जाणा-या क्षेत्रांचा सर्व भाग किंवा त्याचा हिस्सा

१. दारूखाना
२. कर्नाक बंदर
३. खारवा गल्ली
४. नागदेवी स्ट्रीट
५. गुलालवाडी
६. मध्यमुंबई अलंकार टॉकीजजवळचा भाग
७. गिरगांव
८. काळबादेवी
९. सी.पी.टँक
१०. सिंधी गल्ली
११. तांबा काटा
१२. कुंभार वाडा
१३. अर्देशीर डॅडी स्ट्रीट
१४. माझगांव
१५. संत तुकाराम मार्ग
१६. लोखंडी जथा
१७. नारायण धुरु स्ट्रीट
१८. नागदेवी क्रॉस लेन

...६/-

[२] खालीलप्रमाणे ओळखली जाणा-या क्षेत्रांचा सर्व भाग किंवा त्याचा हिस्सा :

१. शिवडी
२. कुर्ला
३. शीव
४. विद्याविहार
५. भांडूप
६. मुलुंड
७. ठाणे

२.२.१ महापालिका आयुक्त यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने सहा वर्षापूर्वी मुलुंड आणि ठाणे दरम्यान असलेला एक भू-खंड माथाडी कामगारांच्या सहकारी संस्थेला दिलेला आहे. माथाडी कामगारानी त्यावर कुंपणाची भिंत आणि पुन:प्रापण असे अंदाजे रु. १/- कोटी इतक्या खर्चाचे काम केले आहे. परिसरातील उद्योगांची मालाची गरज भागविता यावी म्हणून सदर सहकारी संस्थेने त्या जागेवर पोलादाची साठवण केली आहे. मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या सुधारीत विकास आराखडयात ही जागा सहकारी संस्थेच्या लोखंड व पोलाद बाजारपेठेसाठी राखून ठेवण्यात आली आहे असे सांगून त्याच ठिकाणावरुन व्यवसाय चालू ठेवण्यास आपल्याला मुभा मिळावी ही त्या सहकारी संस्थेने केलेली विनंती प्राधिकरणाने सहानुभूती-पूर्वक विचारात घ्यावी अशी सूचना महापालिका आयुक्त यांनी केली.

२.२.२ व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी सांगितले की, त्यांच्या माहितीप्रमाणे माथाडी कामगारांच्या सहकारी संस्थेला संदर्भाधीन लोखंड व पोलाद बाजारपेठ म्हणून वापर करण्यास सुरुवातीस ३ वर्षे मुदतीकरिता तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आली होती आणि घाऊक लोखंड व पोलाद बाजारपेठा कळंबोली येथे स्थलांतरीत केल्या जाईतोवर सदर परवानगीचे दरवर्षी नूतनीकरण करण्यात येत होते.

२.२.३ महानगर आयुक्त यांनी या प्रकरणी लक्ष घालावे अशी सूचना बाब टिप्पणीवरील चर्चेच्या समारोपात करण्यात आली.

२.३.१ लोखंड व पोलादाच्या बाजारपेठा, घाऊक कापड बाजारपेठा आदींचे नवीन ठिकाणी स्थलांतर झाल्यानंतर या बाजारपेठांच्या विद्यमान

...७/-

जागांचा वापर कसा केला जावा यावरही चर्चा झाली. मुंबईचे महापौर यांनी सांगितले की, मुंबईच्या बेट भागावरून घाऊक बाजारपेठा अन्यत्र हलविण्याचा प्रस्ताव मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाने जेव्हा सुरुवातीस केला होता त्यावेळी विद्यमान जागांच्या वापराबाबतीत सूचना करण्यात आल्या होत्या.

२. ३. २ अध्यक्ष महोदय यांनी प्रस्तुत बाजारपेठांच्या सध्याच्या जागा जेव्हा रिकाम्या होतील तेव्हा त्याचा विनियोग करण्याच्या प्रश्नात लक्ष घालण्यासाठी आणि त्या अनुलक्षाने शिफारसी करण्यासाठी संबंधित अधिका-यांचा एक अभ्यासगट नेमण्याची राज्य शासनाला विनंती करण्यात यावी अशी सूचना केली असता त्यावर एकमत झाले.

२. ४ त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ३२४ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठा [स्थल नियमन] अधिनियम, १९८३ चे कलम ३ चे उपकलम[१] खालील प्रत्यायोजित शक्तीआधारे हे प्राधिकरण [मुंबई] महानगर प्रदेश विकास प्राधिकरण] बृहन्मुंबई आणि ठाणे क्षेत्रातील पुढील ठिकाणे ही दिनांक १ जानेवारी, १९८७ ते दिनांक ३० एप्रिल, १९८७ या कालावधीसाठी लोखंड व पोलादाच्या घाऊक व्यापा-याच्या प्रयोजनप्रित्यर्थ उप बाजारपेठा आवारे म्हणून याद्वारे घोषित करीत आहे :

[१.] दक्षिण मुंबईच्या बेट भागावरील पुढीलप्रमाणे ओळखला जाणारा सर्व भाग किंवा त्याचा हिस्सा :

१. दारूखाना
२. कर्नाक बंदर
३. खारवा गल्ली
४. नागदेवी स्ट्रीट
५. गुलाल वाडी
६. मध्य मुंबईत अलंकार टॉकीजजवळचाभाग
७. गिरगांव
८. काळबादेवी
९. सी. पी. टँक
१०. सिंधी गल्ली

...८/-

११. तांबा कांटा

१२. कुंभारवाडा

१३. अर्देशीर डॅडी स्ट्रीट

१४. माझगांव

१५. संत तुकाराम मार्ग

१६. लोखंडी जथा

१७. नारायण धुरु स्ट्रीट

१८. नागदेवी क्रॉस लेन

[२] खालीलप्रमाणे ओळखली जाणा-या क्षेत्रांचा सर्व भाग किंवा त्याचा हिस्सा :

१. भिवंडी

२. कुर्ला

३. शीव

४. विद्याविहार

५. भांडूप

६. मुलुंड

७. ठाणे

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, ठरावाच्या कार्यवाहीसाठी अनुवर्ती कृती करण्याकरिता महानगर आयुक्त यांना याद्वारे शक्ती प्रत्योजित करण्यात येत आहे."

अध्यक्षांच्या अनुमतीने पटल बाब म्हणून पुढील २ बाबींवर बैठकीत विचारविमर्श झाला.

पटल बाब क्र. १ : पहिल्या अंतरिम वाढीचे सुधारीत दर आणि मूळ वेतनामध्ये तदर्थ वाढ देण्याबाबत

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ३२५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम [२] खालील प्रत्यायोजित शक्तीआधारे आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या

इतर सर्व शक्तींचा अवलंब करून, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या शा. नि. क्र.[वित्त]-वेपूर-१२८६/५९९/सेवा-१० दिनांक १०-११-१९८६ मध्ये तरतूद असल्याप्रमाणे या प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचारी वर्गाला [१] पहिल्या अंतरिम वेतनवाढीच्या सुधारीत दरांचा लाभ आणि [२] त्यांच्या मूळ वेतनावर २० प्रतिशत इतकी तदर्थ वाढ किंवा प्रतिमास किमान रु.७५/- हे फायदे दिनांक १-१०-८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यास याद्वारे आपली मान्यता देत आहे."

पटल बाब क्र. २ : १९८५-८६ वर्षासाठी प्राधिकरणाच्या कर्मचा-याना सानुग्रह अनुदान [ Ex-Gratia Payment ] देण्याबाबत :

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ३२६ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुं. म. प्र. वि. प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम [२] खालील प्रत्यायोजित शक्तीआधारे आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व शक्तींचा अवलंब करून, बाब-टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या [वित्त विभाग] क्र. बोनस-११८६/११४३/सेवा-९ अन्वये मंजूर केलेल्या तदर्थ बोनसच्या धर्तीवर व अटीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-याना सन १९८५-८६ वर्षाकरिता सानुग्रह अनुदान [ Ex-Gratia Payment ] देण्यास आपली याद्वारे मान्यता देत आहे."

त्यानंतर, बृहन्मुंबईतील गुरांच्या गोठयांचे स्थलांतर करण्याच्या प्रश्नावरही चर्चा होऊन त्या दृष्टीने यापूर्वीच योजण्यात आलेले उपाय आणि प्रस्तावित उपाययोजनांचा थोडक्यात आढावा घेण्यात आला. बदललेल्या स्थितीत या प्रश्नाचा नव्याने विचार होणे आवश्यक आहे असे सदस्यांनी मत व्यक्त केले. आरे वसाहतीच्या नियंत्रणाखाली असलेल्या विस्तृत जागेत गुरांचे काही गोठे सामावून घेणे शक्य होईल का या प्रश्नाची पुन:श्च पहाणी व्हावी अशी सूचनाही करण्यात आली.

शासनाचे सचिव, नगर विकास विभाग यांनी संबंधित विभागाशी या प्रश्नावर चर्चा करावी अशी इच्छा अध्यक्षमहोदयांनी प्रदर्शित केली असता सचिव, नगर विकास विभाग यांनी ती मान्य केली.

अध्यक्षांचे आभार मानून झाल्यानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

---------

# MINUTES OF THE SPECIAL MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

23 MAR 1987

**DATE** : 26th December, 1986 (Friday).

**TIME** : 11.30 A.M.

**PLACE** : Chamber of the Hon'ble Minister for Urban Development, 2nd Floor, Mantralaya.

**MEMBERS PRESENT** :

| | |
|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Datta Nalawade, Mayor of Bombay. | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri S.S. Tinaikar, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri Dinesh Afzulpurkar, Secretary to Government, Housing and Special Assistance Department. | - Member |
| Shri L.C. Gupta, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member Secretary |

**Item No.1** : Request for exemption from payment of channelisation charges - Application by Behram Sudhar Committee of Bandra.

1.1. During the course of discussion on this item, the following points emerged :-

1.1.1. The Low Income Group tenements such as those constructed by Behram Sudhar Committee should not be

allowed.....

allowed to be transferred by the original members to others. It was, therefore, decided to prescribe the conditions as suggested by Shri Chandrashekhar Prabhu.

1.1.2. Subject to the above, it was decided that exemption from payment of channelisation charges should be given to the hutment dwellers who fulfil the conditions about the monthly income and cost of the tenement as prescribed by Government of India for the Low Income Group housing. It was also agreed that similar concession may be given henceforth to other slum dwellers in Bandra-Kurla Complex, if they undertake similar schemes on their own. It was also agreed that decision in that respect be taken on merits of each case by the Metropolitan Commissioner.

1.1.3. It was noted that even the present rate of channelisation charges viz., Rs.150/- per sq.ft. is insufficient to cover the actual cost as it was fixed about 10 years back and the actual cost of channelisation has more than doubled since then and as such the existing rate of Rs.150/- itself was a concession. Some Members emphasized that exemption from channelisation charges to the Low Income Group housing would further erode BMRDA's already narrow fund base and hence ways and means for augmenting BMRDA's fund should be explored. It was particularly underlined that Government should be prevailed upon to make available to BMRDA at least the statutory amount of Rs.5/- crores annually.

1.2. The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION NO.323 :

"Resolved that in partial modification of erstwhile Standing Committee's Resolution No.151, dated 16.10.1980 read with the decision of the Authority recorded under Item No.17 of its Agenda for the meeting held on 2nd January 1986, the Authority do, having regard to the facts and circumstances reported in the underlying Agenda Note, approve to dispense with the collection and recovery of channelisation charges from the Lessees or the Intending Lessees of the Maharashtra Housing and Area Development Authority in respect of

lands.....

lands situated in Bandra-Kurla Complex and leased or agreed to be leased to them by such Authority, subject to the following conditions :-

(1) That the Lessee or the Intending Lessee and in case the Lessee or the Intending Lessee being a corporate body, all its members should belong to the Low Income Group;

(2) That the expression "Low Income Group" means a person having a monthly income of Rs.1,500/- per month;

(3) That the cost of a house or a tenement to be held by the Lessee or the Intending Lessee or as the case may be each of its members should not exceed Rs.30,000/-;

(4) That the Lessee or the Intending Lessee or as the case may be each of its members should furnish an irrevocable undertaking to the Authority not to transfer or assign the house or the tenement or his rights to or benefits thereunder or to part with the possession thereof for a period of ten years to be counted from the date of such undertaking;

(5) That at any time of transfer of individual tenement the society shall pay to the authority the actual proportionate cost of channelisation charges plus interest calculated from the date of occupation, of that tenement;

(6) That at any time if the original Lessee (present photo pass holder) is not found to be in occupation of the tenement, and the same tenement is occupied by somebody else against the Maharashtra Housing and Area Development Authority rules, then the Society (Behram Sudhar Committee) shall be liable to pay the actual proportionate cost of channelisation charges plus interest calculated from the date of occupation for that particular tenement;

(7) That the Society (Behram Sudhar Committee) shall also give a Bank guarantee or similar guarantee for recovery of these charges in case of default.

"Resolved further that the collection and recovery of channelisation charges from the Behram Sudhar Committee being the Intending Lessee of the Maharashtra Housing and Area Development Authority is hereby dispensed with, subject to their fulfilling the aforesaid conditions.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to implement the foregoing Resolution."

Item No.2 : .....

Item No.2 : Shifting of Wholesale Iron & Steel Market to Kalamboli.
Declaration of Market Area and Market Yard - Amendment to the Notification issued under BMRDA No.TCP/PO(M)/I&S/547, dated 22nd September, 1986.

2.1. While introducing the item before the meeting, the Metropolitan Commissioner stated that the list of existing places where the Wholesale Iron & Steel Markets are presently being conducted as given in the Item Note and the draft Notification appended thereto was not complete and requested to substitute the same by the following, which the Authority agreed :

(1) All that part or portion of the areas in the Island City of Bombay and known as -

(i) Darukhana
(ii) Carnac Bunder
(iii) Kharwa Galli
(iv) Nagdevi Street
(v) Gulalwadi
(vi) Area near Alankar Talkies in Central Bombay.
(vii) Girgaum
(viii) Kalbadevi
(ix) C.P. Tank
(x) Sindhi Galli
(xi) Tambakantha
(xii) Kumbharwada
(xiii) Ardeshir Dady Street
(xiv) Mazgaon
(xv) Sant Tukaram Marg
(xvi) Lokhandi Jatha
(xvii) Narayan Dhuru Street
(xviii) Nagdevi Cross Lane.

(2) All that part or portion of the areas known as -

(i) Sewri
(ii) Kurla
(iii) Sion
(iv) Vidyavihar
(v) Bhandup
(vi) Mulund
(vii) Thane.

2.2.1. The .....

2.2.1. The Municipal Commissioner then stated that about 6 years back, Government of Maharashtra has given a piece of land situate between Mulund and Thane to a cooperative society of Mathadi Workers who has developed the same by constructing a compound wall and reclamation costing about Rs.1/- crore. The said cooperative society stocks steel at that site for catering to the needs of industries in the surrounding areas. In the Development Plan prepared by the Bombay Municipal Corporation, the said area has been reserved for the Iron and Steel Market of the said cooperative society. He, therefore, suggested that the cooperative society's request to allow them to function from the said site be sympathetically considered by the Authority.

2.2.2. The Managing Director, CIDCO stated that as per his knowledge the cooperative society of Mathadi workers was allotted the site under reference for being used as Iron and Steel Stockyard originally for a period of 3 years on temporary basis and the said permission was renewed thereafter on yearly basis till the time wholesale Iron and Steel Markets are shifted to Kalamboli.

2.2.3. At the conclusion of discussion on this suggestion, the Metropolitan Commissioner was requested to look into the matter.

2.3.1. There was also discussion as to the use of existing sites of Iron and Steel Markets, the Textile Markets etc. once these markets are shifted to the new places. It was stated by the Mayor of Bombay that initially when the BMRDA had proposed shifting of various wholesale markets from the Island Bombay to the new places, suggestions were made in respect of using the existing places.

2.3.2. At the suggestion of the Chairman, it was agreed that the State Government be requested to appoint a Study Group of the concerned Officers to go into the problems of using the existing sites, as and when vacated by these markets and make their recommendations in the matter.

2.4. The ....

2.4. The Authority then passed the following Resolution :

RESOLUTION NO.324 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 3 of the Bombay Metropolitan Region Specified Commodities Markets (Regulation of Location) Act, 1983, the Bombay Metropolitan Region Development Authority hereby declares with effect from 1st January, 1987, till 30th April, 1987, the following localities in the Greater Bombay and Thane areas as Sub Market Yards for the purpose of Wholesale trade in Iron and Steel :-

(1) All the part or portion of the areas in the Island City of Bombay and known as -

(i) Darukhana
(ii) Carnac Bunder
(iii) Kharwa Galli
(iv) Nagdevi Street
(v) Gulalwadi
(vi) Area near Alankar Talkies in Central Bombay.
(vii) Girgaum
(viii) Kalbadevi
(ix) C.P. Tank
(x) Sindhi Galli
(xi) Tambakantha
(xii) Kumbharwada
(xiii) Ardeshir Dady Street
(xiv) Mazgaon
(xv) Sant Tukaram Marg
(xvi) Lokhandi Jatha
(xvii) Narayan Dhuru Street
(xviii) Nagdevi Cross Lane.

(2) All that part or portion of the areas known as -

(i) Sewri
(ii) Kurla
(iii) Sion
(iv) Vidyavihar
(v) Bhandup
(vi) Mulund
(vii) Thane.

"Resolved....

"Resolved further that the Metropolitan Commissioner is empowered to take further action for implementation of the Resolution."

The following 2 items were considered as Table Items with the permission of the Chairman :-

Table Item No.1 : Grant of benefits of First Interim Relief as per the Revised Rates and the Adhoc increase in the Basic Pay.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.325 :

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal to sanction revised rates of the First Interim Relief as decided by the Government of Maharashtra vide Government Resolution (Finance Department) No. पेपूर-१२८६/५९९/सेवा-१० dated 10.11.1986 as well as to grant the benefits of an adhoc increase of 20% in the basic pay subject to a minimum of Rs.75/- per month with effect from 1.10.1986 to its employees, as proposed in the Item Note."

Table Item No.2 : Grant of ex-gratia payment to the BMRDA staff for the year 1985-86.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.326 :

"Resolved that in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf the Authority hereby approves the proposal, as elucidated in the Item Note, to grant an ex-gratia payment to the BMRDA staff for the year 1985-86 on the lines of State Government orders as contained in the Government Resolution (Finance Department) No. बोनस-११८६/११४३/सेवा-९ dated 10.11.1986."

At .....

At this stage there was a discussion on the shifting of cattle stables from Greater Bombay during which resume of measures taken/proposed to be taken was taken. Members were of the view that the issue requires re-thinking in the changed situation. It was suggested to examine afresh whether some of the cattle stables could be accommodated in the spacious area under the control of Aarey Colony.

The Chairman of the Authority desired the Secretary, Urban Development to take up this issue with the concerned Department to which the Secretary, Urban Development agreed.

The meeting terminated with a vote of thanks to the Chair.

ffffffffffffffffff

ukd:1187: